# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.01.2025** **वार- गुरुवार**

---

**हुतात्मादिन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज सर्वत्र त्यांना आदरांजली अर्पण करण्यात येत आहे. विविध संस्था संघटना तसंच शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी 11 वाजता मौन पाळून महात्मा गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. आजचा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो, या निमित्त ठिकठिकाणी हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आलं.

**डीआरडीओ**

संपूर्ण देशी बनावटीच्या तेजस या विमानाच्या निर्मितीनंतर आता हेरगिरी करणारं अत्याधुनिक फिफ्थ जनरेशन विमान भारत तयार करत आहे. यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान आणि सुटे भाग तयार करण्याचं काम सध्या सुरू आहे, अशी माहिती संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे अध्यक्ष समीर कामत यांनी आज पुण्यात दिली. संशोधन विकास संस्था आणि इंडियन सोसायटी ऑफ ॲडव्हान्स मटेरियल अँड प्रोसेस इंजिनिअरिंग या संस्थेच्या वतीने इनकॉम-19 या राष्ट्रीय परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. बुलेटप्रूफ जॅकेट निर्मिती हा देखील देशासाठी महत्त्वाचा विषय आहे; यासाठी लागणारा कच्च्या मालाची निर्मिती देशांतर्गत होणं गरजेचं आहे असं कामत यांनी व्यक्त केला. सतीश धवन अंतराळ संशोधन संस्थेचे संचालक डॉ. ए रंगराजन, संशोधन आणि विकास संस्थेचे संचालक डॉ. मकरंद जोशी यावेळी उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या परिसंवादात संरक्षण क्षेत्रातील संशोधनावर चर्चासत्र आणि संशोधनपर निबंधाचं सादरीकरण होणार आहे.

**ससून**

पुण्यातील ससून रुग्णालयात जीबीएसचे 16 रुग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी दोघे कृत्रिम श्वासोच्छवास यंत्रणेवर आहेत. या रुग्णांच्या उपचारासाठी 100 इंट्राव्हिनस इम्युनोग्लोब्युलिन इंजेक्शनची खरेदी रुग्णालयानं केली आहे, असं रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी

सांगितलं. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे 127 रुग्णांचे शौच नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. त्यातील 21 नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणूसंसर्ग आणि 5 नमुन्यांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू संसर्ग आढळला असं आरोग्य विभागानं काळवलं आहे.

**जीबीएस**

दरम्यान जीबीएसच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर दूषित पाण्याचा मूळ स्रोत शोधण्यावर पुणे महापालिकेने भर दिला आहे. त्यासाठी धरणासह, विहीर, सोसायट्यांच्या टाक्या आणि घरांतूनही पाण्याचे नमुने घेऊन चाचणी केली जाणार आहे. याशिवाय पाणलोट क्षेत्रातील कंपन्या, रिसॉर्टस आणि अन्य ठिकाणचं  सांडपाणी कुठे आणि कसं सोडलं जातं, याचीही तपासणी होणार आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिका 2025-26 या आर्थिक वर्षात मिळकत करात कोणतीही वाढ करणार नसल्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने स्थायी समितीसमोर ठेवला आहे. गेल्या नऊ वर्षापासून पुणेकरांच्या मिळकत करात वाढ झालेली नाही.

**Pcmc**

पिंपरी चिंचवडमध्ये स्वच्छ भारत अभियानाच्या अनुषंगाने महानगरपालिकेनं विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्या अनुषंगानं कर्मचाऱ्यांना आरोग्य आणि सुरक्षेबाबत प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

**रब्बी**

राज्यात रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्या सरासरी क्षेत्रापेक्षा अधिक म्हणजे 117 टक्के क्षेत्रावर झालेल्या आहेत. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांप्रमाणेच रब्बी हंगामातील धान्य उत्पादनात वाढ होणार असल्याचा प्राथमिक अंदाज कृषी आयुक्तालयानं वर्तवला आहे. दरम्यान केंद्र आणि राज्य सरकारच्या कृषीविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक असून राज्यातल्या 6 लाख शेतकऱ्यांना हे ओळखपत्र मिळालं आहे.

**निधन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहकार्यवाह धनंजय घाटे यांचं आज पहाटे पुण्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं. ते 53 वर्षांचे होते. जनसेवा बॅंकेत अधिकारी पदावर ते कार्यरत होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. धनंजय घाटे यांनी मराठवाड्यातील भूम, कळंब तसंच धाराशिव इथं संघाचे प्रचारक

म्हणून काम केलं. 2018 पासून प्रांताचे सहकार्यवाह म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी होती. विविध सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांशी त्यांचा मोठा संपर्क होता.

**क्रीडा**

महाराष्ट्रीय मंडळाच्या वतीनं धनंजय दामले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ घेण्यात आलेल्या आंतर-शालेय आणि आंतर-महाविद्यालयीन अडथळा शर्यत स्पर्धेत मुलींच्या तीनही गटामध्ये पी. एस. हुजूरपागा शाळेच्या लक्ष्मी रोड आणि कात्रजच्या संघांनी विजेतेपद मिळवलं. मुलांमध्ये आर्यन्स् वर्ल्ड स्कूल, न्यु इंग्लिश स्कूल रमणबाग आणि भारतीय जैन संस्था स्कूल या संघांनी आपापल्या गटाचं विजेतेपद पटकावलं. स्पर्धेचं पारितोषिक वितरण राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झालं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 तर किमान तापमान 14 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

---

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**